# महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या दिनांक ०४.०८.२०१२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

सदर बैठकीस आयोगाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) श्री. रत्नाकर गायकवाड -- राज्य मुख्य माहिती आयुक्त
२) श्री. भास्कर पाटील -- राज्य माहिती आयुक्त, नागपूर
३) श्री. दी.बा.देशपांडे -- राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद
४) श्री. मा. हि. शहा -- राज्य माहिती आयुक्त, पुणे
५) श्री. मा. हि. शहा -- राज्य माहिती आयुक्त, कोकण (अतिरिक्त कार्यभार)
६) श्री. पी.डब्लू पाटील -- राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई (अतिरिक्त कार्यभार)
७) श्री. भास्कर पाटील -- राज्य माहिती आयुक्त, अमरावती (अतिरिक्त कार्यभार)
८) श्री. पी.डब्लू पाटील -- राज्य माहिती आयुक्त, नाशिक

राज्य माहिती आयोगाची बैठक दिनांक ४.८.२०१२ रोजी आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत खालील विषयांवर चर्चा झाली.

मुद्दा क्र. १ : राज्य माहिती आयोगाकडे प्रलंबित अपिलांची संख्या विचारात घेता, दरमहा अंदाजे ४०० अपिले निकाली काढण्यात यावीत. जेणेकरुन प्रलंबित अपिलांचा निपटारा होईल असे सर्वानुमते ठरले.

मुद्दा क्र. २ : राज्य माहिती आयोगाकडून अधिनियमाच्या कलम २० (१) २० (२) अन्वये लादण्यात येणाऱ्या शास्तीचा तसेच शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रकरणांचा पाठपुरावा करण्यात यावा. ज्या प्रकरणांत शास्ती लादण्यात आली आहे, त्या आदेशाची प्रत संबंधित कोषागार अधिकारी / अधिदान व लेखा अधिकारी यांना तसेच संबधित जन माहिती अधिकारी यांच्या विभाग प्रमुखास पाठवावी. सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे वरिष्ठ दर्जाचे नेमावे. जेणेकरुन शास्ती व शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रकरणांचे गांभीर्य लक्षात घेऊन त्या नुसार कार्यालय प्रमुख कार्यवाही करतील.

मुद्दा क्र. ३ : सर्व सार्वजनिक प्राधिकरणांकडून अधिनियमाच्या कलम ४ ची अंमलबजावणी योग्यरित्या होत आहे किंवा नाही या संदर्भात निरिक्षण करण्यासाठी आयोगात निरिक्षण पथक/ भरारीपथक तयार करण्यात यावे.

मुद्दा क्र. ४ : राज्य माहिती आयोगाचे संगणक स्थळ (Web site) अद्ययावत करण्याचे काम Mahaonline यांचेकडे सोपविण्यात आले आहे. त्यासंदर्भात चर्चा झाली. संगणक संकेत स्थळ अद्ययावत करण्याबाबत सर्व खंडपीठ कार्यालयाकडे अभिप्राय मागविण्यात यावे.

मुद्दा क्र. ५ : राज्य माहिती आयोगातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडे तसेच मेस्को पुणे या संस्थेकडे पाठपुरावा करण्यात यावा.

सर्वांचे आभार मानून मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

मा. मुख्य माहिती आयुक्त

सचिव